# राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना

◆ **उद्देश :**

राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेअंतर्गत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील १८ त ६४ वयोगटातील कोणत्याही कमावत्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास, मृताच्या कुटुंबाला/ वारसाला एकरकमी रुपये १०,०००/- इतके अर्थसहाय्य देण्यात येते.

◆ **पात्रतेचे अन्य निकष, अटी व शर्ती :**

कुटुंबाचे नाव ग्रामीण /शहरी भागाच्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत समाविष्ट असावे.

◆ **लाभाचे स्वरुप :**

कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचा (स्त्री/पुरुष) मृत्यू झाल्यानंतर कुटुंबास/ वारसाला रुपये १०,०००/- एकरकमी अर्थसहाय्य देण्यात येते.

◆ **आवश्यक कागदपत्रे :**

कुटुंबाचे नाव ग्रामीण /शहरी भागाच्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत समाविष्ट असल्याचा पुरावा, रहिवासी दाखला , कर्त्या व्यक्तीच्या (स्त्री/पुरुष) मृत्यूचे प्रमाणपत्र.

◆ **राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेत लोक कशी मदत करु शकणार ?**

दारिद्र्य रेषेखालील यादीत नाव असलेल्या १८ ते ६४ वयोगटातील कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू झाला तर त्या व्यक्तीच्या उत्पन्नाचा कुटुंबाच्या एकूण उत्पनात महत्वाचा हिस्सा/वाटा (sizeable income) आहे, असा क्षेत्रिय अधिकाऱ्यानं अहवाल दिल्यास या योजनेचा लाभ मिळेल.